| उपक्रमाचे नाव | **छत्रपती शाहू महाराज तालुकास्तरीय निबंध स्पर्धा** |
|---|---|
| **उपक्रमाची सुरवात** | सन २०२२-२३ |
| **प्रस्तावना** | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची कर्तुत्वसंपन्न कारकीर्द ही महाराष्ट्र राज्याच्या इतिहासातील एक तेजस्वी पर्व ठरली आहे. सुख विलासाची सर्व साधने पायी घोटाळत असताना कोल्हापूर संस्थानाच्या शाहू महाराजांनी उपभोगशून्य स्वामित्त्व गाजविले. सत्तेचे साधन हाती ठेवून प्रजेचा उत्कर्ष घडविण्यासाठी त्यांनी महत् प्रयास केले. जनतेच्या सर्वांगीण उन्नत्तीचे त्यांनी स्वप्न पाहिले व ते साकार करण्यासाठी सर्वस्व पणाला लावले. |
| **उपक्रम उद्दिष्ट** | शाहू महाराजांच्या कार्याची सर्व विद्यार्थ्यांना ओळख व्हावी व त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी स्वत:च्या जीवनाची उन्नती करावी, या उद्देशाने सारथी संस्थेमार्फत शालेय व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी “राजर्षी शाहू महाराज तालुकास्तरीय व महानगरपालिकास्तरीय निबंधस्पर्धा” आयोजित करण्यात येते. सारथी सस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यातील सर्व प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी सदर निबंध स्पर्धा आयोजित केली जाते. |
| **स्पर्धेचा स्तर/ठिकाण** | सारथी संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यातील सर्व प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी ही निबंध स्पर्धा आयोजित केली जाते इयत्ता .३ री ते ५ वी, ६ वी ते ७ वी आणि ८ वी ते १० वी या गटांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा यासाठी सदर स्पर्धा महाराष्ट्रातील **सर्व ३५८ तालुका व २९ महानगरपालिका स्तरावर** घेतली जाते. |
| **पात्रता अट** | महाराष्ट्रातील सर्व माध्यमाच्या सर्व शाळांचा सहभाग Open To All School इयत्ता 3 री ते इयत्ता 10 वी मध्ये शिकणारे सर्व विद्यार्थी. |
| **अटी व शर्ती** | प्रत्येक गटानुसार स्पर्धेत सहभाग असावा, शब्द मर्यादेचे पालन स्पर्धकाने करावे, स्पर्धेचे माध्यम मराठी राहील, निबंध लेखन स्वतःच्या हस्ताक्षरात असावे, मुख्याध्यापक शिफारस पत्र सादर करावे. |
| **अपात्रतेचे निकष** | 1)मुदतीनंतर सादर केलेले निबंध.<br>2) निबंधलेखन स्पर्धेच्या अटी व शर्ती यांचे पालन न केलेले निबंध |

<table>
<tr><td>पारितोषिकांचे तपशील</td><td>गट क्र. १ :- इ. ३ री ते ५ वी, गट क्र.२:- इ. ६ वी ते इ. ७ वी, गट क्र.३:- ८ वी ते १० वी गटाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा यासाठी सदरची स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व तालुका व महानगरपालिका स्तरावर घेण्यात येते. तालुकास्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन संबधित तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी आणि म.न.पा.स्तरावर प्रशासनाधिकारी (शिक्षण) यांच्या मार्फत केले जाते. निबंध स्पर्धेत सहभागी होऊन पारितोषिक प्राप्त करणाऱ्या प्रत्येक गटातील १ ते १० विजेत्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे बक्षीस रक्कम व प्रशस्तीपत्र देय आहे प्रशस्तीपत्रे पोस्टाद्वारे गटशिक्षणाधिकारी यांचेकडे सबंधित विजेत्या शाळांना पोहोच करण्यासाठी पाठविण्यात येतात. विजेत्या स्पर्धकांना गटनिहाय पारितोषिकाची रक्कम खालीलप्रमाणे आहे.
<table>
<tr><th>पारितोषिके क्रमांक</th><th>गट क्र.१:- ३ री ते ५ वी</th><th>गट क्र.२:- ६ वी ते ७ वी</th><th>गट क्र.३:- ८ वी ते १० वी</th></tr>
<tr><td>प्रथम</td><td>रु.४००</td><td>रु.५००</td><td>रु.७००</td></tr>
<tr><td>द्वितीय</td><td>रु.३००</td><td>रु.३००</td><td>रु.५००</td></tr>
<tr><td>तृतीय</td><td>रु.२००</td><td>रु.२००</td><td>रु.३००</td></tr>
<tr><td>उत्तेजनार्थ ७ पारितोषिके</td><td>(प्रत्येकी) रु.१००</td><td>(प्रत्येकी) रु. १००</td><td>(प्रत्येकी) रु. १००</td></tr>
</table>
(सर्व गटासाठी प्रत्येक तालुक्यास रु. ५,५०० ची रोख बक्षिसे व प्रशस्तीपत्र)</td></tr>
<tr><td></td><td>
<ul>
<li>तालुका स्तरावरील निबंध स्पर्धेच्या प्रत्येक गटासाठी गटशिक्षणाधिकारी व प्रशासनाधिकारी यांनी तीन तज्ञ परीक्षक शेजारच्या तालुक्यातील नियुक्त करावेत. त्यांचेकडून निबंध स्पर्धेचे परीक्षण करून १ ते १० क्रमांक घोषित करावेत. निबंध स्पर्धेचे परीक्षण- आशय- २५ गुण,अभिव्यक्ती - ५ गुण, भाषाशैली- ५ गुण, शुद्धलेखन- ५ गुण, वळणदार हस्ताक्षर व प्रभाव - १० गुण एकूण ५० गुणांच्या आधारे मूल्यमापन करावे.</li>
<li>निबंध स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या तिन्ही गटातील प्रत्येकी गुणानुक्रमे १ ते १० विद्यार्थ्यांची यादी (त्यामध्ये विद्यार्थ्याचे नांव, शाळेचे नांव व पत्ता, ई-मेल, स्पर्धेचा विषय, प्राप्त क्रमांक, विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक, बँक तपशील, नांव, खाते क्रमांक, IFSC Code, बँकेचे नांव, शाखा इ. माहिती सादर करावी.) तसेच व पारितोषिक प्राप्त असणाऱ्या १ ते ३ गटातील विजेत्या १ ते १० क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचे निबंध सारथी कार्यालयास सादर करावेत.</li>
</ul></td></tr>
<tr><td>सन (२०२२-२३ ते २०२४-२५) लाभार्थी संख्या</td><td>स्पर्धेस सहभागी विद्यार्थी संख्या – ३,८८,२१२<br>पारितोषिक प्राप्त विद्यार्थी संख्या – १२,४५३</td></tr>
</table>